स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

महिला सबलीकरणात महाराष्ट्र शासनाची लाडकी बहिण योजनेची भूमिकाः

{ विशेष संदर्भ नांदेड तालुका}

संधोधिका

सौ. मिरा पांडूरंग शेवाळकर

नांदेड.

संशोधन मार्गदर्शक

डॉ. बिभीषण करे

समाजशास्त्र विभागप्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय,नांदेड.

डिसेंबर - 2024

महिला सबलीकरणात महाराष्ट्र शासनाची लाडकी बहिण योजनेची भूमिकाः
{ विशेष संदर्भ नांदेड तालुका}

1.1 प्रस्तावना :

'परिवर्तन' हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे आजबदलत्या परिस्थितीनुसार स्त्रियांच्या स्थितीमध्ये परिवर्तन होत आहे तेव्हा 'जगा आणि जगू द्या' या मानव अधिकाराच्या कक्षेतून स्त्रियांकडे पाहिले गेले. मनुष्य जेव्हा जन्म घेतो तेव्हा त्याला जीवन जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, याच दृष्टिकोनातून जगामध्ये महिला चळवळीचा प्रारंभ झाला. महिला अबला न राहता ती सबला असून तिला समाज निर्मित बंधने, आचार-विचार व व्यवहार यामुळे दुय्यमत्व प्राप्त झाले आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम तिच्या विकास व प्रगतीवर होतो. म्हणूनही बंधने दूर करून तिला विकासाच्या संधी व पोषक वातावरण निर्माण केले पाहिजे असा विचार पुढे आला. यातूनच सबलीकरणाची संकल्पना पुढे येऊन या प्रश्नाचा गांभीर्याने विचार सुरू झाला.

महिला सबलीकरणाच्या दिशेने जगामध्ये प्रत्येक राष्ट्रात कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या घटना घडत जाऊन स्त्री प्रश्न क्रमांक्रमाने जगाच्या सामजिक, राजकीय व आर्थिक धोरण कार्यक्रमाच्या अग्रभागी पोहचला. गेल्या तीनशे वर्षातील या विविध क्षेत्रातील घटना, घडामोडींचा आढवा घेतला तर हा प्रवास किती खडतर होता, हे स्पष्ट होईल. समाजसातत्यासाठी मानवी अधिकारांचे जतन करणे, हाच आपल्या मानवी जीवनाचा खरा पाया होय. पण व्यवहारात दैनंदिन जीवनात असे दिसत नाही. भूक, गरीबी, बेकारी, हिंसाचार, अत्याचार इत्यादींमुळे माणसाचे जीवन दुःखी होऊन व्यक्तीच्या मानव अधिकारांचे हनन होत आहे. मनुष्य जेव्हा जन्म घेतो तेव्हा त्याला जीवन जगण्याचा अधिकार असला पाहिजे. मानव जेव्हा दानव बनून मनुष्यावर अत्याचार करतो तेव्हा मानव अधिकारांचे हनन होते, हाच दृष्टिकोन समोर ठेऊन भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 21 मध्ये नागरिकांना जीवन जगण्याचा अधिकार बहाल केला, नंतर संयुक्त राष्ट्रसंघाने 1966 मध्ये 'मानव अधिकार धोरण' निश्चित केले.

पुरुषांप्रमाणे स्त्रिया देशाच्या विकासाला हातभार लावतात, पण पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्री शक्तीला बंदिस्त केल्यामुळे ही शक्ती अडगळीत पडली. महिला संघटनांबरोबरच सामाजिक विचारवंत, स्वयंसेवी संघटना, शासनाचे महिलां विषयक दृष्टिकोन इत्यादी पुढे आले. त्यामुळे महिला प्रश्न जागतिक ऐरणीवर आले. या प्रश्नाकडे पाहण्याचा सुरुवातीचा दृष्टिकोन सहानुभूतीचा होता. त्यानंतर त्यांच्याकडे मानवी अधिकाराच्या कक्षेतून पाहिले गेले. मग स्त्री चळवळ, समाजसुधारकांचे प्रयत्न तसेच शासनाच्या विविध योजनांमुळे स्त्री हक्क हे मानवीहक्क म्हणून पुढे आले. महिलांची सुरक्षितता,

संरक्षण आणि सक्षमीकरणाच्या उपाययोजनांना अधिक मजबुत करण्याच्या दृष्टिने अनेक योजना सुरु करण्यात आल्या. केंद्रीय महिला अणि बालविकास मंत्रालयाने शक्तीअभियान योजनेसाठी तपशीलवार मार्गदर्षक सुचना जारी केल्या आहेत. महिलांची सुरक्षितता, संरक्षण आणि सबलीकरण या उददेशाने सर्वकश योजना म्हणून केंद्रसरकारने पंधराव्या विता आयोगाच्या वर्ष 2021-22 ते 2025-26 या कार्यकाळातील अंमलबजावणी साठी शक्ती अभियान कार्यक्रम सुरु झाला.

महाराष्ट्र शासनाने 01 जून 2024 पासून राज्यात महिलांची उन्नती, विकास, परिवर्तन आणि सक्षमीकरणाच्या हेतूने 'लाडकी बहिण योजना' सुरु केली. योजनेमुळे महिलांना मासिक 1500 रुपये प्राप्त होत असल्याने कौटुंबिक आणि सामाजिक दर्जात सुधारणा झाल्याचे चित्र आहे. 21 ते 65 या वयोगटातील महिला या योजनेसाठी पात्र असणार आहेत. राज्यातील गरीब, निराश्रीत आणि निराधार महिला लाभार्थी म्हणून योजनेचा लाभ घेत आहेत. 21 ते 65 या वयोगटातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे, महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा मुख्य हेतू या योजनेचा आहे. सदर संशोधनात 'लाडकी बहिण योजना' महिला संक्षमीकरणात कितपत प्रभावी ठरली या बाबतच्या तथ्यावर अधिक भर दिला जाणार आहे.

1.2 संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अभ्यासाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासनाच्या लाडकी बहिण योजनेचे स्वरुप अभ्यासणे.

2) महाराष्ट्रात लाडकी बहिण योजनेच्या पूर्वीची आणि नंतरची महिलांची सामाजिक, कौटुंबिक आणि आर्थिक स्थिती अभ्यासणे.

3) महिला सबलीकरणातील सद्यकालीन परिस्थितीत अडथळे ठरणाऱ्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक घटकांचा अभ्यास करणे.

4) महिला सबलीकरणा संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या लाडकी बहिण योजनांच्या परिणामकारकतेचा चिकित्सक अभ्यास करणे.

5) लाडकी बहिण योजनेमुळे महिलांचे बदललेले सामाजिक, कौटुंबिक आणि आर्थिक जीवन अभ्यासणे.

1.3 संशोधनाची गृहित कृत्ये

1) आधुनिकतंत्रज्ञान आणि विकासाच्या प्रक्रियेत सुद्धा ग्रामीण तथा शहरी महिला मध्ये मागासलेपणाचे प्रमाण अधिक आढळते.

2) महिलांच्या कौटुंबिक, सामाजिक आणि आर्थिक स्थितीमध्ये पुरुषप्रधान संस्कृतीमुळे फारसा फरक पडलेला दिसत नाही.

3) सबलीकरणात शासनाने अनेक योजना आखल्या असल्या तरी प्रभावी अंमलबजावणीच्या अभावामुळे महिलांचा विकास थांबलेला आढळतो.

4) 21 ते 65 या वयोगटातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि स्वयंरोजगाराच्या संधीची उपलब्धता लाडकी बहिण योजने मुळे साध्य होताना आढळते.

5) महाराष्ट्र शासनाची लाडकी बहिण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी मुळे महिलांची सामाजिक, कौटुंबिक आणि आर्थिक स्थिती सुधारताना आढळते.

1.4 संशोधनाच्या मर्यादा

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या मर्यादा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

1) प्रस्तुत अध्ययन महाराष्ट्र शासनाची लाडकी बहिण योजना या उपक्रमाद्वारे महिलांच्या सामाजिक, कौटुबिंक आणि आर्थिक स्थितीत झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणारे आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी 300 महिलांची संशोधनासाठी निवड करण्यात येणार आहे . प्रस्तुत अध्ययनात नांदेड तालुक्यातील महिलांची निवड संभाव्यता नमुना निवड आणि गैरसंभाव्यता नमुना निवड अशा दोन्ही नमुना निवडीचा आधार घेवून एककांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

1.5 सैद्धांतिक परिप्रेक्ष आणि संशोधन पद्धतीचा आराखडा

संशोधनाच्या अचूक आणि वैज्ञानिक मांडणीसाठी ऑगबर्नचा परिवर्तनाचा सिद्धांत, टॉलकॉट पार्सन्सचा समाज संचनेचा सिद्धांत, चार्लस हार्टन कुले यांची प्रतिबींबीत स्वत्व संकल्पना, मार्क्सवादी, उदारमतवादी स्त्रीवादी सिद्धांत, इरावती कर्वेची नातेसबंध संकल्पना अभ्यासण्यात येईल. प्रस्तुत संशोधनाचा विषय सामाजिक शास्त्राशी निगडीत आहे. प्रस्तुत संशोधन अनुभवजन्य विश्लेषणात्मक सर्वेक्षण पद्धतीच्या शोध प्रकारात मोडणारे आहे. अन्वेशणात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन आराखडयाचा आधार घेवून माहितीचे विश्लेषण करण्यात येईल. संशोधनासाठी साधारनपणे तीन वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे.

1.6 प्राथमिक आणि दुय्यम सामुग्री संकलन

प्रस्तुत संशोधन प्राथमिक सामुग्रीवर आधारलेले आहे. प्राथमिक सामुग्री संकलन, प्रत्यक्ष संपर्क व मुलाखत अनुसूची तयार करून अध्ययन करण्यात येईल. प्रत्यक्ष लाडकी बहिण योजना लाभार्थी महिलांच्या मुलाखती घेवून तथ्य संकलनकरण्यात येईल. संशोधन संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही स्तरावर करण्यात येईल. यासाठी व्यष्टी अध्ययन पद्धती बरोबर निवडलेल्या अभ्यास घटकांचे निरीक्षण केले जाणार आहे. महिलांची मुलाखतीत अनुसूचीच्या साह्याने करण्यात आलेले संकलित सामुग्रीचे विश्लेषणात्मक अध्ययन निष्कर्ष मांडणीसाठी वापरण्यात येतील.

प्रस्तुत विषया संबंधी पूर्व प्रकाशित दुय्यम सामुग्री हा देखील संशोधनाचा महत्त्वाचा आधार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी पूर्वसंशोधीत तथा प्रकाशीत साहित्याचा आधार घेवून माहिती विश्लेषण केले जाईल. महाराष्ट्र शासनाच्या स्मरणिका, अहवाल, पाक्षिक, नियतकालिके, जाहीरनामे याच बरोबर विविध ग्रंथ, वृत्तपत्रे इत्यादींचा आधार संशोधेनासाठी घेतला जाईल.

1.7 नमुना निवडः

प्रस्तुत संशोधनात नांदेड तालुक्यातील लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतलेल्या एकुण 300 महिला लाभार्थ्यांची निवडकरण्यात येईल. नमुना निवड प्रकारातील संभाव्यता नमुना निवडीतील यादृश्चिक नमुनापद्धती आणि गैरसंभाव्यता नमुना निवडीतील सहेतूक नमुना निवडीचा आधार घेवून अभ्यास एककांची निवड करण्यात येईल. या दोन पद्धतीचा अवलंब करण्याचा हेतू म्हणजे संशोधनाची उदिद्ष्टे अचूक पद्धतीने साध्य करणे होय.

1.8 सांख्यिकी पद्धतीचा अवलंब :

प्राथमिक तसेच दुय्यम माहितीची मांडणी व विश्लेषण सांख्यिकीय पद्धतीने करण्यात येवून एसपीएसएस या संख्यात्मक साफ्टवेअरच्या आधारे तथ्यांचे विश्लेषण करण्यात येईल. यासाठी सारणीकरण, तालिकाकरण, शेकडेवारी, वारंवारिता, विवरण, टक्केवारी, सहसंबंध गुणक इत्यादी साधनांचा तसेच आलेख, छायाचित्रे, नकाशे इत्यादींचा आवश्यक तेथे उपयोग करण्यात येईल.

1.9 संशोधन विषयाचे स्वरूप व महत्त्व

मानवी संस्कृतीच्या प्रवाहात विकासाचा दर्जा कसा आहे, यावरुन ती संस्कृती ओळखली जाते. सामाजिक प्रगतीचा एक महत्त्वाचा निकश म्हणजे समता, स्वातंत्र्य, न्याय यावर आधारीत समाजाची निर्मिती होय. जागतिक स्तरावर मानवाधिकारांचे उल्लंघन सगळ्यात जास्त लिंग भेदामुळे होते. स्त्रीयांचा विकास, स्त्री सबलीकरण, स्त्री हक्क-अधिकाराचे संरक्षण यासाठी लाडकी बहिण योजनेचा प्रभाव आजघडीला परिणाम कारक ठरत आहे, शासकीय योजनेतील लाडकी बहिण योजना आणि स्त्रीयांचे सक्षमीकरण अभ्यासणे आवश्यक आहे. आजघडीला महाराष्ट्र शासनाच्या लाडकी बहिण योजनामुळे स्त्रीयांचे बदललेले सामाजिक, कौटुंबिक आणि आर्थिक जीवन अभ्यासणे प्रस्तुत संशोधनाचा मुळ हेतू आहे. सांपत्तिक स्थिती, जात वर्ग, शिक्षण, धर्म, वंश, मानसिकता या नुसार व्यक्तीच्या लिंग भावात्मक भूमिकांमध्ये बदल होत असतो. विविध विकास कार्यक्रम आणि उपक्रम यामुळे निश्चितच महिलांच्या सामजिक आणि कौटुंबिक दर्जात सुधारणा आणि बदल होताना दिसतो आहे. यामुळे प्रस्तुत अध्ययन हाती घेण्यात आले आहे. समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून महिलाकडे पाहिले जाते. प्रस्तुत अध्ययनात 01 जून 2024 पासून सुरु करण्यात आलेंल्या लाडकी बहिण

योजना आणि महिलांचे बदललेले सामाजिक जीवन याबाबतचे अध्ययन केले जाणार आहे, ज्यामुळे समाजाच्या विकास आणि प्रगतीची दिशा समजण्यास मदत होईल.

1.10 अध्ययन क्षेत्रः

संशोधन विषयाची व्याप्ती आणि अध्ययनाच्या मर्यादा लक्षात घेता संशोधन अभ्यास क्षेत्र म्हणून नांदेड जिल्हयातील नांदेड तालुक्याची निवड करण्यात येणार आहे.

1.11 प्रकरण रचनाः

प्रस्तुत शोधप्रबंधाची सारांशरूपाने मांडणी खालीलप्रकारे केली आहे.

प्रकरण पहिलेः प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात महिलांची स्थिती, भारतीय समाज संस्कृती, महिलाच्या विकासाठीच्या विविध योजना, महिला सक्षमीकरण संकल्पनांची मांडणी करण्यात येईल. लाडकी बहिण योजना आणि या योजनेचे स्वरूप, कार्यपद्धती, शासनाचे ध्येयधोरण याबाबतची सविस्तर माहिती स्पष्ट करण्यात येईल. भारतीय समाजातील सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वातावरणाचा स्त्री पुरुष संबधावर पडलेला प्रभाव याचे अध्ययन करण्यात येईल. अभ्यासाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके, पूव ʿअभ्यासाचा आढावा, संशोधन कार्यक्षेत्र, तथ्य संकलन इत्यादींची मांडणी करण्यात येईल.संशोधनासाठी नांदेड तालुका हे कार्यक्षेत्र निवडून अभ्यासाचे उद्दिष्ट व गृहितकांची मांडणी करण्यात येईल. पहिले प्रकरण अ} भारतीय समाजाची सांस्कृतिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि ब} पूर्वसंशोधीत साहित्याचे अध्ययन, सैद्धांतिक दृष्टिकोनाचे स्पष्टीकरण आणि संशोधन पद्धतीचे स्पष्टीकरण अशा दोन गटात करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : भारतीय समाज आणि स्त्री दर्जा :

दुसऱ्या प्रकरणामध्ये स्त्री प्रश्नांची पार्श्वभूमी, इतिहास कालखंडातून आजपर्यंत हे प्रश्न समाजा समोर कसे आले, आजही या प्रश्नाचे स्वरूप बदलले असले तरीही ते प्रश्न समाजाला कसे भेडसावतात, यांचा आढावा घेतला आहे. वैदिक काळ, उत्तर वैदिक काळ, मध्यकाळ आणि वर्तमानकाळ यांमध्ये स्त्रियांची स्थिती व दर्जा कसा होता, याचा विचार केला असून त्यासंदर्भात स्त्रीयांच्या स्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे. आजच्या आधुनिक समाजातील स्त्रीच्या कामाचेस्वरूप, कामाचा दर्जा, उत्पन्न, स्त्रीची भुमिका अभ्यासण्या बरोबर लाडकी बहिण योजनेच्या प्रभावाचा अभ्यास सैद्धांतिक दृष्टिकोनातून करण्यात येईल.

प्रकरण तिसरेः लाडकी बहिण योजना : स्वरूप आणि व्याप्ती

तिसऱ्या प्रकरणामध्ये महिला सबलीकरणाचा अर्थ, स्वरूप स्पष्ट करून महिला सबलीकरणाची राज्यात झालेली वाटचाल याचा अभ्यास करण्यात येईल. लाडकी बहिण योजना आणि सबलीकरणातील अडथळे सांगून शासनाचे धोरणाचा प्रभावाचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण चौथे : तथ्य विश्लेषण आणि तथ्यांचे स्पष्टीकरण :

प्रस्तुत प्रकरणात मुलाखत अनुसूची द्वारे प्राप्त तथ्यांचे निर्वचन आणि स्पष्टीकरण करण्यात येईल, यासाठी विविध आलेख, आकृती, पायचार्ट, स्तंभालेख, सारणी यांचा उपयोग करण्यात येईल. गुणात्मक माहितीचे विश्लेषण निरीक्षण आणि व्यष्टी अध्ययना द्वारे प्राप्त माहितीच्या तथ्यांद्वारे करण्यात येईल. तथ्यांचे विश्लेषण अधिक विश्वसनीय व्हावे यासाठी द्विचल सारणींचा उपयोग करण्यात येवून तथ्यांचा सहसंबध स्पष्ट करण्यात येईल. तसेच पूर्वसंशोधीत साहित्य, सैंद्धांतिक दृष्टिकोनाचा आधार घेवून तथ्य विश्लेषण करण्यावर भर दिला जाणार आहे.

प्रकरण पाचवेः सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संशोधन अभ्यासाद्धारे एकूण सांराश, संशोधन अभ्यासाचे निष्कर्ष मांडले जातील. संशोधनातून प्राप्त माहितीच्या आधारे शासनकर्ते, समाजकल्याण अधिकारी, नियोजनकर्ते, नवीन अभ्यासक यांच्यासाठी शिफारशी केल्या जातील.

1.12 परिषिष्टे :

1. अध्ययन क्षेत्र–नकाशा
2. मुलाखत अनुसूची
3. व्यष्टी अध्ययन – तपासणी सूची
4. संशोधनाशी संबधीत छायाचित्रे

1.13 संदर्भ ग्रंथसूचीः

आगलावे, प्रदीप (2008): *सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे,* साईनाथ प्रकाशन, नागपूर.

कवी, माधवी (1999), *महिला कल्याण आणि विकास,* विद्या प्रकाशन, नागपूर.

कुंभार, नागोरावसंपा. (1994), *सामाजिक चळवळी,* डॉ. विद्युत भागवत, स्त्रीमुक्ती चळवळीतील विचार प्रवाह, प्रबोधन प्रकाशन, लातूर.

गोटे, शुभांगी (2004): *महिला सबली करणः स्वरुप व समस्या,* वरद पब्लिकेशन, औरंगाबाद,

गोरे, निलम (1995), *नव्या शतकासाठी महिला धोरण,* स्त्री आधार केंद्र, पुणे,

गोरे, नीलम (2001): *आता आमचा आमाले जीव, समाज आणि महिला* ,प्रकाशक–अरुण जाखडे, पुणे.

जाधव, एस. बी. (2004):*महिला सबलीकरण : बचतगटाचे आश्वासक योगदान,* योजना, अंक डिसेंबर, 2004.

देसाई, जयराम, *महिला सहकारी संस्थांपुढील प्रश्न,* दैनिक सकाळ वृत्त पत्र, दि.31.03.2005,
दैनिक सकाळवृत्तपत्र, रमाई, महिला सक्षमीकरण योजना, दि.26.03.2004.
दैनिकसकाळ, स्वय ंरोजगारातून स्वावलंबन,, दि.23.04.2005, पृ.8.नागपूर,
दासगुप्ता,लोपा, व इतर,{2004}'*महिलांची सद्यःस्थितीः प्रगती व मर्यादा*, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ, नाशिक.
दासगुप्ता, लोपा व इतर ;2004द्ध ''*महिलांचे सबलीकरण, दारिद्र निर्मुलन व स्वयंसहाय्यतागट.*'' यशवंतराव चव्हान महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ नाशिक.
दासगुप्ता, लोपा, व इतर, {2004} '*महिलांचे कुटूंबातीलस्थान*', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ, नाशिक.
परब, वासुदेव(2004):*राष्ट्रीय महिलाकोष*, लोकराज्य, अंक-12, जानेवारी 2004.
पाते, एस.,बी. ;2009द्ध : *'भारतातील सुक्ष्म, आणि मध्यम उपक्रमांची प्रगती',*प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली , योजना, नोव्हेंबर, 2009, अंक : 04, वर्ष : 37
बेहरे, सुमन (1998) :*भारतीय सामाजिक संस्था,* भारतीय महिलांचा दर्जा, विद्याप्रकाशन, नागपरू,
भागवत,विद्या(2001):*स्त्रीवादी सिद्धांतातील परिदृष्टी,*रिफ्रेशरकोर्स,व्याख्यान,पुणे विद्यापी,दि.11.01.2001. पुणे.
महाजन, सुमित्रा (2001):*स्त्री सबलीकरण तत्त्वज्ञानः ध्येय व उद्दिष्टपूर्ती,* योजना, अंक-1, ऑगस्ट, 2001.
माळी, मा.गो. व इतर (1998): *सावित्रीबाईः काल आणि कर्तृत्व,* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई.
महाराष्ट्र शासन, जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन, जिल्हा नांदेड,
रेगे, शर्मिला व इतर (2000): *भारतातील समकालीन कळीचे प्रश्न : स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा,* लिंगभाव आणि श्रम, प्रकाशक- स्त्री अभ्यासकेंद्र, पुणे.
वडसे, उमा, शरयू अनंत राम (1987): *भारतीय महिलांचे समाजातील स्थान,* पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
श्यामकुमार (2000):*महिला हक्क आणि महिला सबलीकरणः स्थिती आणि कृति,* महिला व मानवी हक्क कर्तव्य आणि शिक्षण चर्चा सत्रातील शोधनिबंध, दि.27-28 ऑगस्ट, सरस्वती भुवन महाविद्यालय, औरंगाबाद.

डॉ. बिभिषण करे
संशोधन मार्गदर्शक

सौ. मीरा पांडूरंग शेवाळकर
संशोधिका